सोलापूर तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २९ जुलै २०२६

आतील पानावर
पान २ – बॉलिवूडची 'हिरो' गर्ल करणार कमबॅक!
पान ३ – ग्रेसी सिंग बॉलिवूडपासून कार दूरावली?
पान ४ – 'रामायण'मध्ये अजिंक्य देव दिसणार
पान ५ – ऋषभ शेट्टी साकारणार शिवरायांची भूमिका
पान ६ – अमृताला करायचायं भन्साळींचा सिनेमा



# प्रियांकाचा 'वाराणसी'मधील फर्स्ट लुक व्हायरल

बॉलिवूड ते हॉलीवूड असा यशस्वी प्रवास करणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा पुन्हा एकदा भारतीय चित्रपटसृष्टीत मोठ्या भूमिकेसह पुनरागमन करत आहे. दिग्दर्शक एस. एस. राजामौली यांच्या बहुचर्चित 'वाराणसी' या चित्रपटातून ती प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटातील तिचा 'मंदाकिनी' या व्यक्तिरेखेचा पहिला लुक नुकताच सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला असून, तो सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. प्रियांकाच्या वाढदिवसानिमित्त राजामौली यांनी हे खास फोटो शेअर करत तिच्या व्यक्तिरेखेची झलक चाहत्यांसमोर आणली. राजामौली यांनी सोशल मीडियावर दोन वेगवेगळे फोटो पोस्ट केले आहेत. पहिल्या फोटोमध्ये प्रियांकाने काळ्या रंगाचा पोशाख परिधान केला आहे. तिची हेअरस्टाईल, चेहर्यावरील गंभीर भाव आणि आत्मविश्वासपूर्ण देहबोली लक्ष वेधून घेते. तिचा हा लुक चित्रपटातील एका खास गाण्यातील असल्याचे सांगितले जात आहे. दुसऱ्या फोटोमध्ये ती पांढरा शर्ट आणि काळी पँट घालून उडी मारताना दिसते. तिच्या मागे झेब्रा, जिराफ यांसारखे प्राणी दिसत असल्याने हा सीनही प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण करणारा ठरला आहे. हे फोटो शेअर करताना एस. एस. राजामौली यांनी एक खास कॅप्शने लिहिले. त्यांनी म्हटले, ती हसते तेव्हा खूप सुंदर दिसते आणि ती हसत नाही तेव्हा तिच्या नजरेत आग असते. त्यांच्या या एका वाक्यामुळे प्रियांकाच्या 'मंदाकिनी' या व्यक्तिरेखेबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. चित्रपटातील 'मंदाकिनी' ही व्यक्तिरेखा धाडसी, आत्मविश्वासू, भावनिक आणि जगभर प्रवास करणारी महिला म्हणून दाखवण्यात आली आहे. ती संकटांना न घाबरणारी आणि आपल्या ध्येयासाठी लढणारी व्यक्ती आहे. त्यामुळे प्रियांकाच्या कारकिर्दीतील ही आणखी एक दमदार भूमिका ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रियांका चोप्राने २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द हिरो : लव्ह स्टोरी ऑफ अ स्पाय' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते. त्यानंतर तिने अनेक यशस्वी हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आणि नंतर हॉलीवूडमध्येही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. अभिनयासोबतच तिच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीमुळे ती जागतिक स्तरावर लोकप्रिय झाली आहे.'वाराणसी' हा २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द स्काय इज पिंक' नंतरचा प्रियांकाचा पहिला भारतीय चित्रपट आहे. त्यामुळे भारतीय चाहत्यांमध्ये या चित्रपटाबद्दल विशेष उत्सुकता आहे. या चित्रपटात तिच्यासोबत दक्षिणेतील सुपरस्टार महेश बाबू प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. तसेच अनेक लोकप्रिय कलाकारही महत्त्वाच्या भूमिका साकारणार असल्याचे सांगितले जात आहे. एस. एस. राजामौली हे भव्य आणि दर्जेदार चित्रपटांसाठी ओळखले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत असतात. त्यामुळे 'वाराणसी'कडूनही मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. हा चित्रपट ७ एप्रिल २०२७ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# इंडस्ट्री खूपच विचित्र !

अभिनेत्री अर्चना पूरन सिंह यांनी चित्रपट आणि मालिका अशा दोन्ही माध्यमांमध्ये प्रभावी अभिनयाने स्वतंत्र वेगळी ओळख निर्माण केली आहे. ८० आणि ९० च्या दशकात त्यांनी अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. मात्र तरीही अर्चना यांना जवळपास मागील दहा वर्षांपासून एकाही चित्रपटाची ऑफर आलेली नाही. बॉलीवूडमध्ये जसं काही काम मिळण्याची अपेक्षा होती, तसं न मिळाल्याची खंत अर्चना यांनी व्यक्त केली. रोहित शेट्टीने दिग्दर्शित केलेल्या 'बोल बच्चन' या सिनेमामध्येही अर्चना यांनी प्रभावी भूमिका साकारली होती. यामध्ये त्यांनी अजय देवगण, अभिषेक बच्चन, असिन आणि प्राची देसाई यांच्यासह महत्त्वपूर्ण भूमिका साकारली आणि त्यांच्या अभिनयाचं सर्वांनी कौतुकही झालं होतं. यानंतर त्याच्या सिनेविश्वातील करिअरला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा होती, मात्र असं काहीच घडलं नसल्याचं मत अर्चना पूरन सिंह यांनी व्यक्त केलं आहे. मुलाखतीमध्ये अर्चना म्हणाल्या, 'बोल बच्चन' प्रदर्शित झाल्यानंतर अनेक चित्रपट समीक्षकांनी मला फोन करून सांगितले की, 'आता मला चित्रपटांच्या ऑफर्स येतील.' मी त्यांना गंमतीने म्हणाले की, पहिली ऑफर येताच मी त्यांना फोन करेन. पण १० वर्षे उलटून गेली आणि मला त्यांना फोन करण्याची संधीच मिळाली नाही. आमची इंडस्ट्री खूपच विचित्र आहे. पुढे त्या म्हणाल्या, माझे युट्युब व्हिडीओ प्रेक्षकांना आवडतात आणि ते व्हायरलही होतात. त्यामुळे मला ब्रँड एंडोर्समेंटचे ऑफर्स येतात, पण अभिनयाच्या ऑफर्स अजूनही येत नाहीत. 'टोस्टर' सिनेमानंतरही माझ्याकडे चित्रपटांच्या ऑफर्सची काही रांग लागलेली नाही. मला पुन्हा एकदा सर्व चित्रपट निर्मात्यांना सांगायचं आहे की, मला अभिनय करायचा आहे. मात्र आपल्या इंडस्ट्रीची कामाची पद्धत खूपच वेगळी आहे आणि हेच कदाचित इंडस्ट्रीचे वास्तव आहे. अर्चना पूरन सिंह म्हणाल्या, सिनेमाच्या ऑफर न येण्यामागं अनेक कारणं असू शकतात. मी टीव्ही शो करीत असल्यामुळे निर्मात्यांचा असा समज झाला आहे की, मी चित्रपटाच्या शूटिंगसाठी वेळ देऊ शकणार नाही. अनेक फिल्ममेकर्सना वाटत होतं की मी कॉमेडी शोमध्ये व्यग्र आहे, त्यामुळे चित्रपटासाठी वेळ काढू शकणार नाही. खरं तर त्यांचं म्हणणं काही प्रमाणात योग्यही होतं. कारण टीव्ही शो करत असताना मला काही चित्रपटांच्या ऑफर्स आल्या होत्या, पण त्या स्वीकारता आल्या नाहीत. मी १५ दिवसांसाठी स्कॉटलंडला शूटिंगला जाऊ शकत नव्हते.



# बॉलिवूडची 'हिरो' गर्ल करणार कमबॅक!



८० आणि ९० च्या दशकात आपल्या सौंदर्याने आणि दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मीनाक्षी शेषाद्री आता पुन्हा अभिनयाच्या दुनियेत पुनरागमन करत आहेत. अमेरिकेतून मुंबईत परतल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच त्यांना मोठा प्रोजेक्ट मिळाला असून, त्या लवकरच बहुचर्चित 'नानावटी व्हर्सेस नानावटी' या वेबसीरिजमध्ये महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. या ड्रामाचे दिग्दर्शन निर्माते-दिग्दर्शक विपुल शाह करत असून, या मालिकेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे 'हिरो' या सुपरहिट चित्रपटातील गाजलेली जोडी मीनाक्षी शेषाद्री आणि जॅकी श्रॉफ तब्बल ४० वर्षांनंतर पुन्हा एकत्र स्क्रीन शेअर करणार आहे. १९८३ मध्ये सुभाष घई यांच्या 'हिरो' चित्रपटातून त्या रातोरात स्टार बनल्या होत्या. आता चार दशकांनंतर जॅकी श्रॉफसोबत त्यांना पुन्हा पाहण्याची संधी चाहत्यांसाठी खास ठरणार आहे. निर्मात्यांनी दोघांच्या वयानुरूप भूमिका साकारल्याचे सांगितले जात आहे. आठ भागांच्या या क्राइम-कोर्टरूम ड्रामाचे चित्रीकरण सध्या मुंबईतील अंधेरी येथे सुरू असून, पुढील टप्प्यात पवई परिसरात शूटिंग होणार आहे. या वेबसिरीजमध्ये भाग्यश्री, राम कपूर आणि अनुप्रिया गोएंका यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. राम कपूर सध्या दुसर्या प्रोजेक्टमध्ये व्यस्त असल्याने ते लवकरच या वेबसिरीजच्या शूटिंगमध्ये सहभागी होणार आहेत. मीनाक्षी आणि जॅकी श्रॉफ यांनी यापूर्वी 'हिरो', 'दहेज' आणि 'अल्लाह रखा' यांसारख्या चित्रपटांत एकत्र काम केले असून, त्यांच्या ऑनस्क्रीन केमिस्ट्रीने एकेकाळी प्रेक्षकांची मने जिंकली होती. दरम्यान, 'नानावटी व्हर्सेस नानावटी' या वेबसिरीजचे चित्रीकरण सुरू असले तरी, प्राइम व्हिडिओकडून अद्याप या प्रोजेक्टची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. चित्रीकरणाचा मोठा टप्पा पूर्ण झाल्यानंतर वेबसिरीजचा फर्स्ट लूक आणि अधिकृत घोषणा केली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सेलिना करणार १५ वर्षांनी पुनरागमन

अभिनेत्री सेलिना जेटली १५ वर्षांच्या दीर्घ ब्रेकनंतर अभिनयाच्या क्षेत्रात पुनरागमन करणार आहे. अलिकडेच स्वत:च्या खासगी आयुष्यातील समस्यांमुळे चर्चेत राहिलेल्या अभिनेत्रीने सोशल मीडियावर स्वत:च्या कमबॅक प्रोजेक्टची घोषणा केली आहे. सेलिना राष्ट्रीय पुरस्कार विजेते फिल्ममेकर राम कमल मुखर्जी यांच्या आगामी चित्रपटात सिस्टर निवेदिता यांची व्यक्तिरेखा साकारताना दिसून येणार आहे.

सेलिना सध्या घटस्फोट आणि मुलांच्या ताब्याच्या प्रकरणात गुंतून पडली आहे. ती स्वत:चा भाऊ निवृत्त मेजर विक्रांत कुमार जेटलीला भारतात परत आणण्यासाठी देखील संघर्ष करत आहे. तो सध्या युएईतील तुरुंगात कैद आहे. सेलिनाने इन्स्टाग्रामवर स्वत:च्या नव्या चित्रपटाचे मोशन पोस्टर शेअर केले आहे. या चित्रपटाची निर्मिती अरित्र दास आणि सर्बानी मुखर्जी करत आहेत. राम कमल मुखर्जी यांच्या दमदार चित्रपटासोबत मोठ्या पडद्यावर परतणार आहे. इतिहासातील सर्वात असाधारण महिलांपैकी एक सिस्टर निवेदिता यांची व्यक्तिरेखा साकारत असल्याचे सेलिनाने म्हटले आहे. माझ्या आयुष्याचा प्रवास निवेदिता यांच्याशी मिळताजुळता आहे. सिस्टर निवेदिता यांच्याप्रमाणे मी देखील युरोपमध्ये वर्षे वास्तव्य केल्यावर भारतात परतली आहे, आरामाच्या शोधात नव्हे तर स्वत:च्या जीवनाला पुन्हा सावरणे अन् स्वत:च्या जीवनाचा उद्देश शोधण्यासाठी सेलिनाने स्वत:च्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.



# आर्यन कॅमेऱ्यासमोर का हसत नाही?

बॉलीवूडच्या किंग खान शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान हा सोशल मीडियावर नेहमी चर्चेमध्ये असतो. अनेकदा तो क्रिकेटच्या मैदानावर मॅच बघायला किंवा हॉटेलमध्ये जाताना दिसून येत असतो. दिग्दर्शक म्हणून सिनेविश्वामध्ये काम सुरू केलेल्या आर्यनच्या एका फोटोसाठी पापाराझी त्याच्या मागे धावत असतात. पण आर्यन हा कधीच त्यांना फोटोसाठी हसून पोझ देताना दिसून येत नाही. सोशल मीडियावर आर्यन खान कधीच का हसत नाही असा प्रश्न नेहमी विचारला जातो. यावर आता अभिनेता राघव जुयालने प्रतिक्रिया दिली आहे. आर्यन हा त्याच्या खाजगी आयुष्यामध्ये अगदी वेगळा असल्याचे मत राघवने व्यक्त केले आहे. मुलाखतीमध्ये राघव जुयाल याने सिनेविश्वातील कामाचा अनुभव आणि आर्यन खानशी मैत्री याबाबत सांगितले आहे. राघवने गेल्या वर्षी नेटफ्लिक्सवरील 'द बॅड्स ऑफ बॉलीवूड' या वेब सीरिजमध्ये महत्त्वाची भूमिका साकारली होती. या वेब सिरीजची निर्मिती, लेखन आणि दिग्दर्शन शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानने केले होते. या सिरीजमध्ये एकत्र काम केल्याने आर्यन व राघव यांच्यामध्ये चांगली मैत्री झाली आहे. आर्यन हा अतिशय चांगली व्यक्ती असल्याचे म्हणत राघवने त्याच्या दिग्दर्शनाचे कौतुक केले आहे. या मुलाखतीमध्ये राघव जुयालला, आर्यन खान सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये किंवा कॅमेऱ्यासमोर का हसत नाही?' असा प्रश्न विचारण्यात आला. यावर राघव म्हणाला, आर्यनला उगाच खोटं हसायला येत नाही. त्याला कोणासमोर दिखावा करायलाही आवडत नाही. आर्यन जसा आहे, त्याला तसंच राहायला आवडतं आणि लोकांनी त्याला तसंच स्वीकारलं पाहिजे. राघव पुढे म्हणाला, तो खूपच क्रिएटीव्ह, मनमोकळ्या आणि नम्र स्वभावाचा आहे. हाच त्याचा खरा स्वभाव आहे. खाजगी आयुष्यात आर्यन खूप वेगळा आहे. त्याला जर हसायचं नसेल, तर ती त्याची मर्जी आहे. घरी मात्र तो खळखळून हसत असतो, मजा करतो. आर्यन खूप विनोद आणि मज्जा-मस्ती करतो.



# तेनजिंग नोर्गेवर येणार चित्रपट



माउंट एव्हरेस्ट प्रथम सर करणारे महान गिर्यारोहक तेनजिंग नोर्गे यांच्या आयुष्यावर एक चित्रपट निर्माण होणार आहे. याचे नाव 'तेनजिंग' असेल आणि या बायोपिक ड्रामापटात टॉम हिडलस्टन आणि गेंडन फुंट्सोक मुख्य भूमिका साकारणार आहेत. या चित्रपटाची निर्मिती ॲपल टीव्हीकडून केली जात आहे. तर दिग्दर्शन ऑस्ट्रेलियन फिल्ममेकर जेनिफर पीडम करतील. चित्रपटाची कहाणी ल्यूक डेव्हिस लिहिणार आहेत. हा चित्रपट २९ मे १९५३ च्या ऐतिहासिक घटनेवर आधारित असेल. त्यावेळी शेरपा तेनजिंग नोर्गे आणि न्यूझीलंडचे एडमंड हिलेरी यांनी पहिल्यांदा माउंट एव्हरेस्ट शिखरावर पाऊल ठेवले होते. तेनजिंग नोर्गेची भूमिका अभिनेता गेंडन फुट्सोक साकारणार आहे, तर एक नेपाळी-भारतीय शेर्पा गिर्यारोहकाच्या रुपात दिसून येईल. एडमंड हिलेरी यांच्या भूमिकेत हॉलिवूड स्टार टॉम हिडलस्टन दिसून येईल. याचबरोबर विलेम डॅफो, वॅट्रिओना बाल्फे, तेनजिन डल्हा आणि थिनले ल्हामो चित्रपटात काम करणार आहेत. हा चित्रपट ९ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. तर १६ ऑक्टोबरपासून हा चित्रपट पाहता येणार आहे.



# ग्रेसी सिंग बॉलिवूडपासून का दूरावली?

बॉलिवूड अभिनेत्री ग्रेसी सिंगने आपल्या साध्या आणि नैसर्गिक अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनात वेगळी ओळख निर्माण केली. ग्रेसी सिंगने अभिनयाची सुरुवात थेट चित्रपटांमधून केली नव्हती. १९९७ मध्ये तिने 'अमानत' या दूरचित्रवाणी मालिकेतून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. त्यानंतर १९९९ मध्ये 'हु तू तू' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये प्रवेश केला. मात्र, या चित्रपटातून तिला अपेक्षित यश मिळाले नाही. २००१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'लगान' या चित्रपटाने ग्रेसीच्या आयुष्याला मोठे वळण दिले. या यशामुळे ग्रेसी सिंग रातोरात स्टार बनली आणि तिच्याकडे अनेक मोठ्या चित्रपटांच्या ऑफर येऊ लागल्या. 'लगान'नंतर ग्रेसीने सलग काही यशस्वी चित्रपटांमध्ये काम केले. अजय देवगणसोबतच्या 'गंगाजल' आणि संजय दत्तसोबतच्या 'मुन्ना भाई एमबीबीएस' या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. याशिवाय ती 'मुस्कान' या चित्रपटातही झळकली. मात्र, सुरुवातीच्या मोठ्या यशानंतर तिच्या कारकिर्दीचा वेग हळूहळू कमी झाला. मोठ्या बॅनरच्या चित्रपटांमध्ये तिची निवड कमी होत गेली. परिणामी, ग्रेसी हळूहळू चित्रपटसृष्टीपासून दूर गेली आणि तिची उपस्थितीही कमी झाली. ग्रेसी सिंगबाबत एक गोष्ट अनेकांना माहीत नाही. ती स्वभावाने अतिशय शांत आणि मितभाषी आहे. 'लगान'मध्ये गावातील साध्या आणि लाजाळू मुलीची भूमिका साकारल्यानंतर प्रत्यक्ष आयुष्यातही ती फार कमी बोलू लागली. तिच्या या स्वभावाचा अनेकांनी चुकीचा अर्थ लावला. लोकांमध्ये फार न मिसळणे आणि कमी संवाद साधणे यामुळे तिला काही जणांनी 'घमंडी अभिनेत्री' असेही संबोधले. मात्र, तिच्या जवळच्या लोकांच्या मते ती स्वभावाने नम्र आणि साधी आहे. आज ग्रेसी सिंग चित्रपटसृष्टीपासून बऱ्याच अंशी दूर आहे आणि अतिशय खाजगी आयुष्य जगत आहे. तरीही 'लगान', 'गंगाजल' आणि 'मुन्ना भाई एमबीबीएस'मधील तिच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहेत.



# मलायका पुन्हा एकदा रिलेशनशिपमध्ये ?


बॉलीवूड अभिनेत्री मलायका अरोरा ही अजूनही तिच्या अदांमुळे आणि सौंदर्यामुळे चाहत्यांना घायाळ करते. ५२ वर्षीय मलायकाचा फिटनेस आणि तिची फिगर पाहून वय हा केवळ एक आकडा असतो हे लक्षात येते. मलायकाने अनेक वर्षे सिनेविश्वामध्ये काम केले असून तिने जबरदस्त हिट गाणी दिली आहेत. तिच्या कामासह वैयक्तिक आयुष्यामुळे ती जास्त चर्चेत असते. काही वर्षांपूर्वी तिच्यापेक्षा लहान असलेल्या अर्जुन कपूरसह लिव्ह इनमध्ये राहणारी मलायका आता आणखी एका 'मिस्ट्री मॅन'सह दिसून आली आहे, यामुळे सोशल मीडियावर चर्चांना उधाण आले आहे. मलायका अरोरा ही सोशल मीडियावर सक्रिय असून तिच्या आयुष्यातील अपडेट शेअर करत असते. नुकतेच तिने इन्स्टाग्रामवर काही फिरायला गेल्याचे फोटो शेअर केले आहेत. यामध्ये ती सुंदर सम द्रकिनारी सुट्ट्यांचा आनंद घेताना दिसून येत आहे. या फोटोतील तिचा अंदाज आणि तिचा फिटनेस चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे. समुद्रकिनारी घालवलेल्या या सुट्टीचे तिने अनेक फोटो शेअर केले आहेत. मात्र, त्यातील शेवटचा एका मुलासह असणार्या फोटोने लक्ष वेधले आहे. यावरून मलायकाने नवीन बॉयफ्रेंड शोधल्याची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. मलायका अरोराने ग्रीसमधील सुट्टीतील काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. एका फोटोमध्ये ती पारंपरिक ग्रीक शैलीतील घरात गुलाबी आणि लाल रंगाच्या बिकिनीमध्ये निवांत क्षणांचा आनंद घेताना दिसत आहे, तर दुसर्या फोटोमध्ये ती समुद्रकिनार्यावरील खडकांवर गुलाबी बिकिनीमध्ये पोझ देताना दिसते. याशिवाय तिने गडद मरून रंगाच्या हॉल्टर-नेक ड्रेसमधील काही संध्याकाळचे खास फोटोही शेअर केले आहेत. या सर्व फोटोंमध्ये तिचा स्टायलिश अंदाज आणि फिटनेस चाहत्यांचे लक्ष वेधून घेत आहे. हे फोटो शेअर करीत मलायकाने माझ्या खास स्टाइलिंगसह ग्रीसमधील उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचा सुंदर अनुभव, अशा आशयाचे कॅप्शन लिहिले आहे. त्याचबरोबर हॉलीडे मूड, ग्रीसगेटअवे, ट्रॅव्हलिंगस्टाईल अशा हॅशटॅगसह

# 'गोलमाल ५'मध्ये प्रियामणि

बॉलिवूडची सर्वात यशस्वी फ्रेंचाइजी पुन्हा एकदा स्वत:च्या नव्या चित्रपटासोबत परतणार आहे. गोलमाल ५ चित्रपटाच्या माध्यमातून अजय देवगण आणि त्याची गँग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

रोहित शेट्टीचा कल्ट कॉमेडी चित्रपट पुन्हा लोकांना खळखळून हसविणार आहे. या चित्रपटात काही नवी नावं जोडली गेली असून यात अक्षय कुमार सामील आहे. तसेच आता दक्षिणेतील एका अभिनेत्रीची या चित्रपटात एंट्री झाली आहे. गोलमाल ५ मध्ये अजय देवगणसोबत अक्षय देखील दिसणार आहे. तर खलनायिकेच्या भूमिकेसाठी प्रियामणिचे नाव निश्चित करण्यात आले आहे. चित्रपटात ती एक नकारात्मक छटा असलेली भूमिका साकारणार आहे. प्रियामणिसाठी ही भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल. तिच्या भूमिकेची एंट्री चित्रपटात अनेक ट्विस्ट अँड टर्न्स घेऊन येईल असे मानले जात आहे. प्रियामणिने यापूर्वी अजय देवगणसोबत मैदान या चित्रपटात काम केले होते. तसेच फॅमिली मॅन या वेबसीरिजद्वारे तिने देशभरात स्वत:चा मोठा चाहतावर्ग निर्माण केला आहे. यामुळे तिचे चाहते गोलमाल ५ मधील तिचा अभिनय पाहण्यासाठी उत्सुक आहेत.

# 'रामायण'मध्ये अजिंक्य देव दिसणार




बॉलिवूड दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुप्रतिक्षित 'रामायण: पार्ट १' या चित्रपटाची प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू श्रीराम, साई पल्लवी सीता माता आणि यश रावणाच्या भूमिकेत दिसणार आहेत. आता या भव्य चित्रपटाबाबत आणखी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

मराठमोळे अभिनेते अजिंक्य देव यांचीही या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहे. अजिंक्य देव महर्षी विश्वामित्र यांची भूमिका साकारणार आहेत. रामायणात महर्षी विश्वामित्रांची भूमिका अतिशय महत्वाची आणि मार्गदर्शक होती. ते श्रीरामांचे व लक्ष्मणाचे म र्गदर्शक गुरु होते, ज्यांनी राम- लक्ष्मणाला ताडकावधासारख्या संकटातून सोडवले, दिव्य अस्त्रांचे ज्ञान दिले आणि मिथिला नगरीत नेऊन सीतास्वयंवर व विवाहाचा मार्ग सुकर केला होता. अलीकडेच दिल्लीतील भारत मंडपम येथे 'रामायण'चा ३ऊ ट्रेलर निवडक पाहुण्यांसाठी दाखवण्यात आला. ट्रेलर पाहिल्यानंतर अनेक दिग्दर्शक, निर्माते आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवरांनी त्याचे भरभरून कौतुक केले. विशेषतः रणबीर कपूरचा प्रभू श्रीरामाचा लूक, यशचा रावण आणि साई पल्लवीची सीता यांची झलक प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्याची चर्चा आहे. 'रामायण: पार्ट १' दिवाळी २०२६ मध्ये जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.



# ऋषभ शेट्टी साकारणार शिवरायांची भूमिका

बहुचर्चित 'द प्राईड ऑफ इंडिया: छत्रपती शिवाजी महाराज' या ऐतिहासिक चित्रपटाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. या भव्य चित्रपटात ऋषभ शेट्टी छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारणार असून, चित्रपटातील युद्धदृश्ये अधिक वास्तववादी आणि भव्य करण्यासाठी निर्मात्यांनी थेट हॉलिवूडच्या स्टंट टीमची मदत घेतली आहे. चित्रपटातील ॲक्शन आणि युद्धदृश्यांची जबाबदारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध स्टंट दिग्दर्शक मार्क हेन्सन यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांनी यापूर्वी 'Game of Throner', 'Vikingr', 'The Witbher' AmU 'Graviry' यांसारख्या जागतिक स्तरावरील गाजलेल्या प्रकल्पांमध्ये काम केले आहे. मार्क हेन्सन यांच्यासोबत व्लाड रिमबर्ग यांचाही स्टंट टीममध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यांनी 'The Fate of the Fruioru', 'Bloodrhot' आणि 'Lubifer' यांसारख्या प्रकल्पांवर काम केले आहे. तसेच क्रेग मॅक्रे, ज्यांनी 'Troy: Fall of a Ciry' सारख्या ऐतिहासिक प्रकल्पांवर काम केले आहे, तेही या टीमचा भाग असणार आहेत. हा चित्रपट केवळ भारतीय प्रेक्षकांसाठीच नव्हे, तर जगभरातील प्रेक्षकांना लक्षात घेऊन तयार केला जात आहे. या ऐतिहासिक चित्रपटात ऋषभ शेट्टी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत दिसणार आहेत. त्यांच्यासोबत अर्जुन रामपाल आणि विवेक ओबेरॉय यांच्याही महत्त्वाच्या भूमिका असणार आहेत. 'कांतारा'च्या अभूतपूर्व यशानंतर ऋषभ शेट्टी आता या महत्त्वाकांक्षी ऐतिहासिक चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. 'कांतारा'साठी त्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला होता. त्यामुळे 'द प्राईड ऑफ इंडिया: छत्रपती शिवाजी महाराज' या चित्रपटाकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा अधिकच वाढल्या आहेत.




# बॉलीवूडमध्ये वेळ पाळली जात नाही

भारतीय दाक्षिणात्य सिनेविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री काजल अग्रवाल हिने बॉलीवूडमध्येही स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. तिने तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने चाहत्यांच्या मनावर राज्य केले आहे. काजलने 'मगधीरा', 'सिंघम', 'थुप्पाक्की' आणि 'इंडियन २' यासारख्या चित्रपटांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. दाक्षिणात्य व बॉलीवूडमध्ये काम केलेल्या काजलनं दोन्ही इंडस्ट्रीतील कामाची पद्धतीवर मत मांडले आहे. बॉलीवूडमध्ये वेळ पाळली जात नसल्याची खंत काजलने व्यक्त केली आहे. काजल अग्रवालने एक मुलाखतीत सिनेविश्वातील अनुभव सांगितले. यावेळी तिने बॉलीवूडमधील भूमिका काळजीपूर्वक निवडल्याचे सांगितले. ती म्हणाली, साऊथ इंडस्ट्रीमध्ये मला ज्या दर्जेदार भूमिका मिळत होत्या, तशा मला बॉलीवूडमध्ये मिळत नव्हत्या. मला नेहमी चांगल्या व प्रभावी भूमिका साकारायला आवडतात, पण मला हव्या तशा भूमिका मिळत नव्हत्या. पण जर दाक्षिणात्य सिनेमांमध्ये मला चांगलं काम होतं तर साधारण भूमिकेसाठी मी बॉलीवूडमध्ये कशाला काम करू? दर्जेदार चित्रपट व भूमिका करणं या गोष्टींना मी नेहमी प्राधान्य दिले आहे. पुढे ती म्हणाली, मनोरंजन क्षेत्रामध्ये भाषा ही कधीच अडथळा बनली नाही. एखादा सिनेमा तयार होण्याची जी कला आहे, ती मला खूप आवडते. माझं या कलेवर प्रेम आहे. पण सात ते आठ चित्रपट केल्यानंतर मला सिनेमांमध्ये काम करणं आवडू लागलं आणि मी त्या कामाशी पूर्णपणे एकनिष्ठ राहिले. काजलने वेळेचे महत्त्व आणि शिस्त बॉलीवूडने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीकडून शिकायला हवी असे स्पष्ट मांडले. ती म्हणाली, वेळेचं महत्त्व आणि वेळ पाळणं ही गोष्ट बॉलीवूडने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीकडून शिकली पाहिजे. हिंदी चित्रपटांमध्ये कोणतीही गोष्ट वेळेवर होत नाही. पण दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत प्रत्येक गोष्ट ठरलेल्या वेळेनुसार होते. मला ठरलेल्या वेळेत सेटवर पोहोचण्याची सवय आहे आणि मला तसंच काम करायला आवडतं. मात्र हिंदी चित्रपटांमध्ये वेळेचं कोणतंच नियोजन नसतं. यानंतर तिला कोणत्या अभिनेत्यासाठी सर्वात जास्त वाट पाहावी लागली, असा प्रश्न विचारण्यात आला. यावर काजल म्हणाली, सलमान खानने मला खूप जास्त वेळ वाट पाहायला लावली होती आणि त्याची मला सवय नव्हती, असे ही सांगितले.



# साई पल्लवीचा सीतेच्या भूमिकेसाठी अनोखा मार्ग



साऊथ चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी सध्या दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या बहुचर्चित 'रामायण' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती माता सीता यांची भूमिका साकारत आहे. नुकत्याच झालेल्या एका विशेष कार्यक्रमात साई पल्लवीने या भूमिकेसाठी तिने केलेल्या तयारीबद्दल मनमोकळेपणाने सांगितले. सीतेसारखी पूजनीय व्यक्तिरेखा साकारणे ही केवळ अभिनयाची गोष्ट नसून ती एक मोठी जबाबदारी असल्याचे तिने स्पष्ट केले. 'रामायण'ची पहिली झलक दाखवण्यासाठी नवी दिल्ली येथे एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला चित्रपटातील कलाकार, निर्माते, तंत्रज्ञ तसेच आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी साई पल्लवीने सीतेची भूमिका साकारताना आलेले अनुभव आणि त्यासाठी केलेली मानसिक व आध्यात्मिक तयारी सर्वांसोबत शेअर केली. साई पल्लवी म्हणाली की, प्रत्येक कलाकाराच्या कारकिर्दीत अशा प्रकारची भूमिका एकदाच येते. माता सीतेसारख्या श्रद्धास्थान असलेल्या व्यक्तिरेखेची भूमिका साकारणे हे तिच्यासाठी मोठे भाग्य आहे. अशा भूमिकेला न्याय देण्यासाठी केवळ अभिनय पुरेसा नसतो, तर त्या व्यक्तिरेखेचा भाव, तिचे विचार आणि तिची पवित्रता मनापासून समजून घ्यावी लागते. तिने सांगितले की, तिने कधीही स्वतःहून ही भूमिका मिळवण्याचा प्रयत्न केला नव्हता. या चित्रपटाचा भाग होण्याची संधी मिळणे हेच तिच्यासाठी मोठे सौभाग्य आहे. त्यामुळे या भूमिकेकडे तिने अत्यंत नम्रतेने आणि आदराने पाहिले. सीतेची भूमिका साकारण्यासाठी साई पल्लवीने एक वेगळी पद्धत अवलंबली होती. ती दररोज शूटिंग सुरू होण्यापूर्वी काही वेळ शांत ठिकाणी बसून ध्यान करत असे. त्या वेळी ती मनोमन माता सीतेची प्रार्थना करत असे. 'माझ्यामार्फतच माता सीतेचे व्यक्तिमत्त्व पडद्यावर जिवंत होऊ दे,' अशी प्रार्थना ती रोज करत असल्याचे तिने सांगितले. तिच्या मते, अशा पवित्र व्यक्तिरेखेचा अभिनय करताना आधीच ठरवून हावभाव किंवा संवाद सादर करता येत नाहीत. त्या भूमिकेचा आत्मा समजून घेणे आणि मनापासून ती जगणे अधिक महत्त्वाचे असते. त्यामुळे ध्यान आणि प्रार्थनेमुळे तिला त्या भूमिकेशी भावनिकरित्या जोडले जाण्यास मदत झाली. साई पल्लवी तिच्या साधेपणासाठी आणि नैसर्गिक अभिनयासाठी ओळखली जाते. त्यामुळे ती साकारणारी सीतेची भूमिका कशी असेल, याबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. तिच्या या आध्यात्मिक तयारीची माहिती समोर आल्यानंतर चाहत्यांनीही तिच्या समर्पणाचे कौतुक केले आहे.





# अमृताला करायचायं भन्साळींचा सिनेमा

मराठी अभिनेत्री अमृता खानविलकर हिंदीतही सक्रीय आहे. 'राजी'सारख्या सिनेमात तिची छोटी भूमिका होती. तसंच ती नुकतीच 'तस्करी' या सीरिजमध्ये इमरान हाश्मीसोबत दिसली. अमृताने मराठी आणि हिंदीमध्येही उत्तम करिअर घडवलं आहे. आता तिचं संजय लीला भन्साळी फिल्मम ध्ये काम करणं हे एकच ध्येय आहे. नुकतंच एका मुलाखतीत तिने भन्साळींसोबत झालेल्या भेटीचा किस्सा सांगितला.

अमृता खानविलकर म्हणाली, मला संजय लीला भन्साळींबरोबर काम करायचंय. हे माझं अंतिम ध्येय आहे. चंद्रमुखीची गाणी त्यांनी बघितली होती आणि तेव्हापासून आमचा संवाद सुरु झाला होता. तोपर्यंत हिरामंडी सीरीज आलेली होती आणि त्यांनी मला बोलता बोलता हिरामंडीच्या प्रीमिअरचं आमंत्रण दिलं होतं. तिथे जाणं माझ्या आयुष्यातला सर्वात सुंदर अनुभव होता. तिथे जाण्यासाठी मी खूप उत्साहित होते. भन्साळी सर मला दिसले आणि त्यांना पाहून मी उभी राहिले. मी त्यांना नमस्कार केला. तेव्हा ते माझ्याशी मराठीत बोलले. 'तुम्ही आलात मला खूप छान वाटलं' असं ते म्हणाले. ती पुढे म्हणाली, ते माझ्यापासून दोन पायर्या खाली उभे होते आणि तिथून तो जोरात माझ्याशी मराठीत बोलले. मग मी त्यांच्या तिथे गेले आणि पाया पडले. ते बाजूला उभ्या असलेल्या अभिनेत्रीला सांगत होते की 'ही खूप सुंदर कलाकार आहे. मी हिचं बाई गं गाणं बघितलं.

तिने खूप सुंदर पद्धतीने ते केलं'. ते माझं त्या अभिनेत्रीसमोर कौतुक करत होते. मला विश्वासच बसत नव्हता. तो अनुभव मी विसरुच शकत नाही. मला माहितीये मला एकदा तरी त्यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळेल. मी रोज हे मॅनिफेस्ट करते. संजय लीला भन्साळींच्या फिल्मच्या फ्रेममध्ये येणं हेच माझं ध्येय आहे.

# 'या' चित्रपटात झळकणार कलाकारांची मांदियाळी




'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या विनोदी कार्यक्रमाची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात आहे. या शोमुळे अनेक नवोदित कलाकार घराघरांत पोहोचले. यापैकी एक अभिनेता म्हणजे निमिष कुलकर्णी. आपल्या सहजसुंदर अभिनयशैलीने आणि विनोदाचं अचूक टायमिंग साधत निमिषने प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं आहे. निमिष 'मर्डरवाले कुलकर्णी' या मराठी नाटकानंतर 'अग्नि' या चित्रपटामध्ये झळकला. मराठी नाटक आणि हिंदी चित्रपटानंतर आता निमिष 'द्विधा' या आगामी मराठी चित्रपटातून मराठी रुपेरी पडद्यावर दमदार पदार्पण करणार आहे. येत्या २१ ऑगस्टला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. निमिष या सिनेमात आदित्य (आदि) ही व्यक्तिरेखा साकारणार आहे. मनाने प्रेमळ, समजूतदार आणि विश्वासू असलेला आदित्य कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारा आहे. आदित्य हा श्रावणीचा आत्येभाऊ. बालपणापासून एकत्र वाढल्यामुळे त्यांच्या नात्यात प्रेम, विश्वास आणि अनेक सुंदर आठवणींची घट्ट वीण आहे. तो इतरांप्रमाणे जास्त बोलत नाही; पण प्रत्येकाच्या मनातील न बोललेले भाव अचूक ओळखण्याची त्याच्यात विलक्षण संवेदनशीलता आहे. कधी कधी सर्वात मोठा आधार हा मोठ्या शब्दांत नव्हे, तर शांतपणे आपल्या माणसांना आधार देण्यात असतो, याची जाणीव आदित्य आपल्याला त्याच्या व्यक्तिमत्त्वातून करून देतो. या चित्रपटाबाबत निमिष कुलकर्णी म्हणतो, द्विधा' हा केवळ बाप-लेकीच्या नात्याचा चित्रपट नाही, तर प्रत्येक नात्यात दडलेल्या भावनांचा प्रवास आहे. या चित्रपटात माझी भूमिका साकारताना अनेक भावनिक पैलू अनुभवायला मिळाले. निलेश नाईक सरांची संवेदनशील मांडणी आणि अनुभवी कलाकारांसोबत काम करण्याचा अनुभव खूप समृद्ध करणारा ठरला. प्रेक्षकांनी माझ्यावर आतापर्यंत भरभरून प्रेम केलं आहे. 'द्विधा'मधील माझी ही भूमिका देखील त्यांना नक्कीच आवडेल, अशी मला आशा आहे. या चित्रपटाचं लेखन व दिग्दर्शन निलेश भास्कर नाईक यांचं असून, या सिनेमाच्या निर्मात्या विदुला रमेश आजगावकर आहेत. चित्रपटात सतीश पुळेकर, मानसी कुलकर्णी, रेणुका दफ्तरदार,आस्ताद काळे, तन्वी कुलकर्णी,मनोज कोल्हटकर, भूषण कडू, प्रफुल्ल सावंत, हेमांगी वेळणकर आणि ओवी तानवडे यांच्या भूमिका आहेत.

# भूमिकेसाठी करण खास मालवणी शिकला!




मराठी सोशल मीडियावर आपल्या भन्नाट विनोदांनी आणि सहज अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणारा 'ऑरेंज ज्युस गँग'चा सदस्य करण सोनावणे आता मोठ्या पडद्यावरही तितक्याच दमदार अंदाजात झळकणार आहे. झी स्टुडिओज प्रस्तुत आणि कायरा कुमार क्रिएशन्स निर्मित आगामी हॉरर-कॉमेडी चित्रपट 'भूतम भयम'मध्ये करण एका अस्सल मालवणी तरुणाच्या भूमिकेत दिसणार असून, या भूमिकेला वास्तवदर्शी बनवण्यासाठी त्याने खास मालवणी भाषा शिकण्याची मेहनत घेतली आहे. करण मुळात मालवणी भाषिक नसतानाही त्याने या भूमिकेसाठी स्वतःवर विशेष मेहनत घेतली. फक्त संवाद पाठ करून न थांबता, मालवणी भाषेची लकब, उच्चार, शब्दफेक आणि बोलण्याची सहज शैली समजून घेण्यासाठी त्याने सातत्याने सराव केला. यासाठी त्याने आपल्या मालवणी मित्रांची, चित्रपटाच्या सेटवरील मालवणी सहकार्यांची मदत घेतली. संवादांमधील प्रत्येक शब्द नैसर्गिक वाटावा, पडद्यावर कुठेही कृत्रिमपणा जाणवू नये, यासाठी त्याने अनेकदा संवादांची उजळणी करत भाषेवर प्रभुत्व मिळवलं.याबद्दल करण सोनावणे म्हणाला, या चित्रपटात मी साकारत असलेलं पात्र मालवणी असल्याचं समजलं, तेव्हाच मला जाणवलं की ही भाषा फक्त बोलायची नाही, तर ती जगायची आहे. सुरुवातीला मालवणीतील काही शब्द, त्यांचा उच्चार आणि बोलण्याची लय समजून घेणं माझ्यासाठी खूप आव्हानात्मक होतं. काही शब्द वारंवार चुकायचे, काही वाक्यं म्हणताना मराठी भाषेच्या सवयीनुसार मी बोलायचो. पण, मला ही भूमिका कुठेही खोटी वाटू द्यायची नव्हती. त्यामुळे मी माझ्या मालवणी मित्रांशी सतत बोलत राहिलो. सेटवरही जे मालवणी सहकारी होते त्यांचं बोलणं बारकाईने ऐकलं, त्यांना माझे संवाद ऐकवून दुरुस्त करून घेतले.

एकाच संवादाचा पुन्हा-पुन्हा सराव केला. हळूहळू भाषेची गोडी लागली आणि तिची सहजता अंगी आली. आज पडद्यावर स्वतःला मालवणीत बोलताना पाहताना खूप वेगळं आणि समाधानकारक वाटतं. प्रेक्षकांनाही माझा हा प्रयत्न नक्की आवडेल, अशी मला आशा आहे. कलाकार म्हणून प्रत्येक भूमिकेत काहीतरी नवीन शिकायला मिळतं आणि 'भूतम भयम'मुळे मला मालवणी भाषेचं सौंदर्य जवळून अनुभवता आलं, ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे.'भूतम भयम' या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन रामचंद्र अरुण गांवकर यांनी केलं आहे. या चित्रपटात सौरभ घाडगे, शुभम जाधव, सिद्धांत सरफरे, नील साळेकर आणि करण सोनावणे यांच्यासोबत पुष्कराज चिरपुटकर आणि मनमीत पेम यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

'कभी तनहाइयो मे यू हमारी याद आयेगी...' ( १९६१, हमारी याद आयेगी) गाणे प्रिल्यूडमधील बासरी व सतारीच्या रोमहर्षक सुरात सुरू होते. विशिष्ट गोडवा व नैसर्गिक दु:खछटा अंतर्भूत असलेल्या संवेदनशील आवाजाची गायिका मुबारक बेगमच्या विरही अंदाजात 'कभी तनहाइयो... ' हे दूतातील स्वर ढगाळ आसमंताला अवचित जागे करतात. 'हमारी याद आयेगी' हे शब्दस्वर लांबवून माधुर्य वाढते. मध्यम स्वरात 'अंधेरे छा- ' म्हणून 'बिजली क्रउंध जायेगी' हे दृदात गाऊन आवर्तन पूर्ण होते. मेझो सोप्रानो (मध्यम स्वरसीमेची गायिका) प्रकारची आवाजाची जातकुळी असलेल्या मुबारक बेगम यांनी त्या काळी इतर गोड आवाजापेक्षा वेगळीच लोकप्रियता मिळविली होती.

# वारियाने कुंडल हाले। डोळे मोडीत राधा चाले:

## स्नेहल भाटकर




आशा 'ए मेरे हमसफर ले, रोक अपनी नजर... ( १९६०, छबीली) ,नूतन या अभिनेत्रीच्या आवाजात जादू आहे हे भाटकर ओळखून होते. त्याचा प्रत्यय या गाण्यात आला. 'ले रोक अपनी नजर ना देख इस कदर ये दिल है बडा बेसबर' प्रेमाचे अंकुर मनात फुटलेल्या तरुणीच्या लज्जायुक्त कंपित स्वराचा चपखल उपयोग नूतनच्या स्वरातून करून घेतला. कंपित स्वरातील तरलभाव खुबीने संगीतात साकार केला व आगळावेगळा प्रयोग केला.

'हाले दिल उनको सुनाना था सुनाया ना गया...' (१९६४ फरियाद ) रसिकांच्या भावतरंगांना प्रसवणारे सुमन कल्याणपूर या मुलायम सिल्की स्वरांच्या गायिकेने गायलेले भाटकरांचे हे गाणे, मर्मबंधातली ठेवच आहे.

संगीतात बासरीच्या साथीत 'हाले दिल', संथ व दृदात गाऊन 'सुनाया' प्रथम थोडे प्रलंबित करून सुमनताईंच्या स्वरांची कसरत भाटकरांनी करून गाणे अजरामर केले. प्रत्येक कडव्यात बासरी व संतूरच्या साथीत, 'मुझे लाना था' म्हणून 'लाया ना गया, बनाना था' म्हणून 'बनाया ना गया, छुपाना था' म्हणून 'छुपाया ना गया' अशा प्रकारे प्रयोग करून आपली संगीतकारिता सिद्ध केली. चित्रपट संगीताच्या सुवर्णकाळातील गाण्यात या गाण्याची गणना नक्कीच होईल.

'ओ देखो देखा देख रहा था पपीहा। पपीहा जाके सबको कहेगा' वरील चित्रपटातील या गाण्याची सुरुवातच दृत स्वरात घेऊन जलद गतीने महेंद्र कपूर यांच्या आवाजात अभिनव प्रयोग भाटकरांनी संगीतात करून मजा आणली. 'झिम झिम झिम,

सर सर सर, टीम टीम टीम' अशा कवींच्या नाद निर्मित शब्दांतून भटकरांनी सुमनताईच्या बहुश्रुत आवाजातून नादनिर्मिती उत्कटपणे साधली. 'जईयोना बिदेस मोरा जिया भर आयेगा...' (१९४७, नीलकमल) मुकेश, मन्नाडे हे दोघेही नंतरच्या शंकर जयकिशनच्या काळात भलेही राज कपूरचा आवाज ठरले असतील; पण राज कपूर यांना पहिला उसना आवाज स्नेहल भाटकर यांनी वरील राजकुमारीसोबत गायलेल्या गाण्यात दिला आहे.

'ऐसो से क्या मोह बढाना। जो नही सीखे प्रीत निभाना चिंता ना घर बार कोई। जिनका ना कोई ठिकाणा...' या ओळी व अजून एक कडवे राज यांचे चित्रपटातील पहिले गाणे आहे. 'राधा के मनकी मुरलिया पुकारे मुरारी मुरारी मुरारी' (१९५१, नंदकिशोर) लता यांच्या दैवी स्वराबद्दल गौरवग्रंथ व कोश लिहिले असतील, परंतु भाटकरांसारख्या काही संगीतकारांनी या स्वरांना गोंजारून असे काही माधुर्यात घोळले की त्या रागिन्या आठवणीच्या हिंदोळ्यावरून खाली उतरतच नाही. या चित्रपटातील संगीत भाटकर यांच्या संगीतातील महत्त्वाचा टप्पा होता.

नुसत्या ध्रुपद गायकीनेच कलेजा खल्लास! नंतर मुरारीचे वेगवेगळ्या थाटातील आवर्तने ऐकताना तूर्यावस्था प्राप्त होते. भीमपलास रागातील हे नुसते गीत नसून कान्हाच्या बिरहात विव्हळ होऊन आळवलेली सुरेख आळवणी आहे. १९४८ सालचा रौप्य महोत्सवी चित्रपट 'सुहागरात' मधील गाण्यांनी भाटकरांनी कीर्तिमान स्थापन केले. 'कहता हूं इस दिलसे और हँसी धुंडी ये कोई आता है फिर ख्याल की ऐसा कही नही' तसेच 'नमक छिड़कते है खले ले मजा। वही आसुं खहाय वही आसुं...' तलत मेहमूद या गझल सम्राटाकडून या सुप्रसिद्ध गझल 'गुनाह' मध्ये गाऊन घेतल्या व आपले त्याही क्षेत्रातले वर्चस्व सिद्ध केले.

भाटकर यांच्या हिन्दीतील दिग्विजयी कारकीर्दीनंतर त्यांच्या मराठी चित्रपट संगीताविषयी जाणून घेऊ. भाटकर ज्या दोन गैरफिल्मी मराठी गाण्यांसाठी प्रसिद्ध आहेत ती त्यांची खरी प्रसिद्धी आहे. 'वारियाने कुंडल हाले। डोळे मोडीत राधा चाले...' संत एकनाथ महाराजांची गौळण भाटकर यांनी गाऊन अमर केली. स्नेहल भाटकर यांनी अनेक मधाळ गाण्यांना जन्म देऊन तसेच गाऊन चित्रपटसृष्टीत मोठे योगदान दिले आहे. काही गाण्यांचे नुसते उल्लेख केले तरीही स्मृतीचे दरवाजे उघडतात. पण त्या गाण्याच्या जन्मदात्याचे स्मरणही होत नाही. दुर्दैवाने ते उपेक्षेच्या गर्तेतच फेकले गेले आहे, असे नाईलाजाने म्हणावे लागते. प्रयोगशीलता हा संगीतकाराचा प्राण असतो हे सांगणारे वासुदेव गंगाराम भाटकर उर्फ स्नेहल भाटकर यांचा जन्म १७ जुलै १९१९ रोजी मुंबईत झाला. गोड गळ्याचे वरदान आईकडून प्राप्त झाले. १९४५ साली सुधीर फडके सोबत वासुदेव- सुधीर नावाने 'रुक्मिणी स्वयंवर' या हिंदी-मराठी चित्रपटास सर्वप्रथम संगीत दिले. तत्कालीन दिग्गज केदार शर्मा यांनी त्यांची परख केली व १९४७ साली 'नीलकमल' चित्रपटास बी. वासुदेव नावाने स्वतंत्र संगीत दिले. लगोलग १९४८ च्या 'सुहागरात' चित्रपटाच्या संगीताने ते नावारूपास आले. त्यांच्या स्नेहल नामे मुलीच्या नावाने स्नेहल भाटकर नावाने पुढील संगीत यात्रा केली. त्यांनी २७ हिंदी, १२ मराठी व १० मराठी नाटकास संगीत दिले. खालील पुरस्कार त्यांना प्राप्त झालेत. मराठी चित्रपटातील नावाजलेले अभिनेते 'रमेश भाटकर' हे त्यांचे सुपुत्र होते. स्नेहल भाटकर यांचा संगीत प्रवास २९ मे २००७ रोजी पूर्णपणे थांबला. 'जईयोना बिदेस मोरा। जिया भर आयेगा', 'नाही चिरा नाही पणती' अशा दुर्लक्षिलेल्या संगीतकाराच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या आठवणीची एक पणती लावण्याचा हा क्षीण प्रयास...

**रमेश पोफळी**



# ... तर जगही जिंकता येतं!

प्रियंका चोप्राने बॉलिवूडपासून हॉलीवूडपर्यंत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. जागतिक स्तरावर यश मिळवलेल्या या अभिनेत्रीने अलीकडेच मनोरंजन क्षेत्रातील बदलत्या संधींबाबत आपले मत मांडले. आजच्या डिजिटल युगात नवोदित कलाकार आणि चित्रपट निर्मात्यांसाठी पूर्वीपेक्षा अधिक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे ती म्हणाली. चांगली कल्पना आणि सर्जनशीलता हीच आजची सर्वात मोठी ताकद असल्याचेही तिने स्पष्ट केले. कान्स लायन्स परिषदेत बोलताना प्रियंकाने चित्रपटसृष्टीतील बदलांवर भाष्य केले. कमी बजेटमध्ये तयार झालेल्या आणि मोठे यश मिळवलेल्या काही चित्रपटांचे उदाहरण देत तिने सांगितले की, आज एखाद्याकडे चांगली कथा किंवा कल्पना असेल तर ती जगासमोर मांडणे खूप सोपे झाले आहे. सोशल मीडिया, यूट्यूब आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे कोणालाही आपली कला आणि विचार लाखो लोकांपर्यंत पोहोचवता येतात. आजच्या काळात परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. डिजिटल क्रांतीमुळे आणि ओटीटी प्लॅटफॉर्मच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे जगभरातील प्रेक्षक विविध भाषांतील आणि संस्कृतीतील कंटेंट स्वीकारत आहेत. यामुळे भारतीय चित्रपट आणि वेब सिरीज यांनाही जागतिक ओळख मिळाली आहे. करिअरच्या सुरुवातीच्या काळात अनेकांनी भारतीय चित्रपटसृष्टीबाबत शंका व्यक्त केल्याचे प्रियंकाने सांगितले. भारतीय चित्रपट इंग्रजी भाषेत नसल्यामुळे त्यांना जागतिक स्तरावर फारसे यश मिळणार नाही, असे अनेकांचे मत होते. मात्र काळानुसार ही धारणा बदलली आहे. प्रियंकाने स्वतःचे प्रॉडक्शन हाऊस सुरू करण्यामागील उद्देशही स्पष्ट केला. तिच्या मते, अनेक प्रतिभावान कलाकार आणि दिग्दर्शकांकडे उत्तम कल्पना असतात, पण त्यांच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ किंवा योग्य संपर्क नसतात. अशा लोकांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांची स्वप्ने पूर्ण व्हावीत, यासाठी तिने निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले. ती म्हणाली की, आजच्या काळात एखाद्याकडे दमदार कल्पना असेल तर ती त्याची सर्वात मोठी संपत्ती ठरू शकते. योग्य संधी मिळाल्यास कोणताही नवोदित कलाकार किंवा चित्रपट निर्माता यशस्वी होऊ शकतो. त्यामुळे नव्या पिढीने आत्मविश्वासाने पुढे येऊन आपल्या कल्पनांवर काम करावे, असा संदेशही तिने दिला.



# दाक्षिणात्य चित्रपटात शनाया कपूर

चित्रपटसृष्टीत स्टार किड्स असूनही स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी अनेकांना संघर्ष करावा लागत आहे. याप्रकरणी अभिनेता संजय कपूरची कन्या शनायाचे नाव घेतले जाऊ शकते. शनाया आता बॉलिवूडमध्ये अपयशी ठरल्यावर दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीकडे वळली आहे. शनायाची चुलत बहिण जान्हवी कपूरने यापूर्वीच दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम करण्यास सुरुवात केली आहे. जान्हवीच्या पावलावर पाऊल ठेवत शनाया देखील दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम करणार आहे. शनाया ही तेलगू सुपरस्टार तेजा सज्जाचा आगामी चित्रपट 'झॉम्बी रेडी २'मध्ये दिसून येणार आहे. झॉम्बी रेडी हा चित्रपट २०२१ मध्ये प्रदर्शित झाला होता. निर्माते आता याचा सीक्वेल घेऊन येणार आहेत. यात मुख्य कलाकार म्हणून तेजा सज्जा आणि शनाया यांची निवड करण्यात आली आहे. शनाया या चित्रपटाद्वारे दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे. यापूर्वी मल्याळी सुपरस्टार मोहनलाल यांच्या वृषभ चित्रपटासाठी तिची निवड करण्यात आली होती. परंतु काही कारणांमुळे तिला तो गमवावा लागला होता. शनाया कपूरने आंखो की गुस्ताखियां चित्रपटाद्वारे अभिनयाच्या क्षेत्रात पाऊल ठेवले होते. तिचा हा चित्रपट फ्लॉप ठरला होता. यानंतर ती 'तू या मैं' या चित्रपटात ती दिसून आली होती. परंतु हा चित्रपट देखील अपयशी ठरला होता.



# 'बारह नंबर'मध्ये एहसास

अभिनेता, कॉमेडियन आणि फिल्ममेकर वीर दासने स्वत:च्या पुढील दिग्दर्शकीय चित्रपट बारह नंबर'ची घोषणा केली आहे. या चित्रपटात शीबा चड्ढा, अरुणोदय सिंह, एहसास चन्ना आणि अतुल कुलकर्णी यासारखे कलाकार आहेत. हा सायकोलॉजिकल हॉररपट असणार आहे. दासने चालू वर्षाच्या प्रारंभी 'हॅप्पी पटेल : खतरनाक जासूस' चित्रपटाद्वारे दिग्दर्शनाच्या क्षेत्रात पदार्पण केले होते. बारह नंबर चित्रपटासाठी वीर दास पुन्हा सहदिग्दर्शक कवि शास्त्रीसोबत पुन्हा काम करणार आहे. या चित्रपटात वीर दास भूमिकाही साकारणार असून त्याच्यासोबत निहारिका लायरा दत्त, श्रिया पिळगावकर, सुहैल नय्यर, पूजा स्वरुप आणि नवीन कौशिकही दिसून येणार आहेत. या प्रोजेक्टमध्ये सामील असलेले सर्व कलाकार अभिनयनिपुण आहेत. प्रेक्षकांना प्रत्येक क्षण खरा वाटला तरच भयपट प्रेक्षकांना पसंत पडतो. या कलाकारांच्या टीमने कहाणीला मोठे स्वरुप मिळवून दिले असल्याचा दावा वीर दासने केला आहे. एहसासने यापूर्वी अनेक वेबसीरिजमध्ये काम करत स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. हा चित्रपट तिच्यासाठी मोठी संधी ठरणार आहे.

# अहान शेट्टीची हॉरर चित्रपटात एन्ट्री?

विक्रम भट्ट यांनी त्यांच्या पुढील हॉरर चित्रपटाची घोषणा केली होती. गेल्या महिन्यात विक्रम भट्ट यांनी एक मोशन पोस्टर शेअर करत माहिती दिली होती की, ते त्यांची लोकप्रिय फ्रेंचायझी '१९२०' पुढे नेत आहेत. त्यादरम्यान त्यांनी '१९२०: विंटर इज कमिंग' ची घोषणा केली. आता या चित्रपटाबाबत एक अपडेट समोर आली आहे. विक्रम भट्ट यांच्या या हॉरर चित्रपटात अहान शेट्टीची एन्ट्री होणार आहे. अहान शेट्टी शेवटचा 'बॉर्डर २' मध्ये दिसला होता आणि या चित्रपटातील त्याच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले होते. यादरम्यानच अहान शेट्टीला विक्रम भट्ट यांच्या '१९२०: विंटर इज कमिंग' या हॉरर चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली आहे. विक्रम भट्ट आणि अहान शेट्टी यांच्या '१९२०: विंटर इज कमिंग' या हॉरर चित्रपटाची निर्मिती आनंद पंडित करत असून याचे बजेट १४ कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. या चित्रपटाचे शूटिंग ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२६ मध्ये शिमला येथे करण्याचे नियोजन आहे. मेकर्स सध्या दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतून मुख्य अभिनेत्रीचा शोध घेत असून अनेक नवीन अभिनेत्री या भूमिकेसाठी उत्सुक आहेत. अहान शेट्टीने २०२१ मध्ये 'तडप' या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. या चित्रपटाचे दिग्दर्शन मिलन लुथरिया यांनी केले होते आणि यात तारा सुतारिया त्याच्यासोबत मुख्य भूमिकेत होती. यानंतर तो अनुराग सिंग दिग्दर्शित 'बॉर्डर २' या चित्रपटात दिसला. या चित्रपटाच्या यशानंतर प्रेक्षकांना अहानच्या आगामी प्रोजेक्टमधून खूप अपेक्षा आहेत.

